**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**
**तक्रार क्रमांक : ३८/२०१८**

तक्रारकर्ता श्री.**महेश गंगाधर मानकर,**
**रा.शिव चौक, गुरूवार बाजार, वाशिम, ता.जि.वाशिम**

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी,
**कार्यालय शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद वाशिम, ता.जि.वाशिम**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा **शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
**जिल्हा परिषद वाशिम, ता.जि.वाशिम**

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २२.०८.२०२४**

| | | |
|---|---|---|
| **तक्रारकर्ता** | : | **उपस्थित (प्रतिनिधी)** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपिलीय अधिकारी** | : | **उपस्थित** |

प्रस्तुत प्रकरणी यापूर्वी दि.३०.११.२०२३ रोजी सुनावणी घेवून खालील प्रमाणे अंतरिम आदेश पारित करण्यात आला होता.

" सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व तक्रारकर्ता यांचे युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, द्वितीय अपील क्र.३८३९/२०१४ दि.०४.०८.२०१७ रोजी पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन झाले नसल्याने तक्रारकर्ता श्री.महेश मानकर यांचेवतीने कलम १८ अंतर्गत तक्रार अर्ज दाखल करण्यात आली असून यात शास्ती, नूकसान भरपाई तसेच आदेशाचे इतर निर्देशाचे अनुपालन झाले नसल्याने कठोर कार्यवाही करण्याची मागणी केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी आयोगाचे अपील दि.१०.०७.२०२३ रोजी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना सुनावणी सूचना जारी करण्यात आली असून दि.१०.०८.२०२३, दि.०५.१०.२०२३ व दि.२१.११.२०२३ रोजी सूचना जारी करण्यात आली असून त्यात पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन करण्यासंबंधित याआधिच सूचित करण्यात आले आहे. दि.२०.०१.२०१८ रोजी तक्रारकर्ता यांना नुकसान भरपाई बाबत कुठलीच कार्यवाही झाली नसल्याबाबत शिक्षणाधिकारी माध्यमिक, जिल्हा परिषद, वाशिम यांना अवगत करण्यात आले होते. मात्र यावर कुठलीही कार्यवाही झाली असल्याचे

अथवा खुलासा केला असल्याचे आढळून येत नाही. माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० (१) व २०(२) या खालील कार्यवाही सुरु करण्यापुर्वी नैसर्गीक न्यायतत्वाला अनूसरुन कलम २० (१) मध्ये नमूद तरतुदीनूसार विद्यमान शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम तसेच तेथील जन माहिती अधिकारी यांना पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन करण्याचे व खुलासा सादर करण्याची अंतिम संधी प्रदान करण्यात येत आहे. वरील कार्यवाही ४ आठवड्यात करण्यात यावी अन्यथा वरील प्राधिकरणास कुठलाच खुलासा सादर करण्यास स्वारस्य नसल्याचे गृहीत धरुन एकतर्फी कार्यवाही करण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांना खुलासा सादर करण्याची अंतिम संधी देण्यात येत असून त्यांनी ४ आठवड्याच्या आत खुलासा व अनुपालन अहवाल सादर करावा. जर खुलासा सादर न केल्यास त्यांना कोणताही खुलासा करावयाचा नाही, असे गृहीत धरून एकतर्फी कार्यवाही करण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.**

वरिल पारित अंतरिम आदेशाचे अनुपालनासाठी सदर तक्रारीवर दिनांक २२.०८.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता यांचे प्रतिनिधी ॲड.राजेंद्र पांडे हे उपस्थित आहेत. तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व विद्यमान जन माहिती अधिकारी स्वत: श्री.आकाश अहाळे हे उपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.दिनेश तरोळे व श्री.आर.पी.ठाकूर हे उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे, जन माहिती अधिकारी यांचा खुलासा व तक्रारकर्ता यांचे युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, तक्रार क्रमांक ३८/२०१८ यात दि.३०.११.२०२३ रोजी याआधिच पारित केलेल्या आदेशाचे अनुषंगाने प्राधिकरणाला यात खुलासा सादर करण्याविषयी निर्देश देण्यात आले होते. विशेषत: दि.०४.०८.२०१७ रोजी पारित आदेशाचे अजिबात अनुपालन करण्यात आले नसल्याचे अपिलकर्ता यांचा गंभीर आक्षेप लक्षात घेता, शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, वाशिम येथील जन माहिती अधिकारी तसेच अपिलीय अधिकारी यांना उपरोक्त आदेशाचे अंमलबजावणीची अद्यायावत वस्तुस्थिती दर्शक खुलासा सादर करण्याविषयी नमूद करण्यात आले होते. त्यानुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.दिनेश तरोळे व श्री.आर.पी.ठाकूर यांनी दि.२६.०७.२०२४ रोजीच्या शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, वाशिम यांचे पत्राचे अनुषंगाने उपरोक्त आदेशाचे अनुपालन केले असून, यात रु.१५,०००/- (अक्षरी रुपये पंधरा हजार फ़क्त) शास्तीची व अपिलार्थीस नूकसान भरपाईची रक्कम रु.२०००/- वसूल करण्यबाबत कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने त्यांचेकडून रु.१५,०००/- (अक्षरी रुपये पंधरा हजार फक्त) शास्तीची रक्म वसूल करण्यात आली असून, चलाण द्वारे लेखाशिर्षाखाली जमा करण्यात आली असून, अपिलार्थीस देण्याचे नूकसान भरपाईची रक्कम ही अद्यापही प्रलंबित असून त्याबाबतीत लवकरात लवकर कृती करण्यात येईल, असे आश्वासीत केले. प्रस्तुत प्रकरणी दि.०४.०८.२०१७ रोजीच्या आदेशातील मुद्या

क्र. २ याचे अवलोकन केले असता, मा.मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांच्या डॉ.छाया कुलाल विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ अमरावती, श्री.हरीष राऊत विरुध्द राज्य माहिती आयोग, नागपूर, राजू गोयल विरुध्द कोकण खंडपीठ, मुंबई यासंदर्भात अतिशय स्वयंस्पष्ट भाष्य केले असून, मा.उच्च न्यायालय यांचे उपरोक्त निर्णयाचे अनुषंगाने आदेशातील प्रथम अपिलीय अधिकारी यांचे विरुध्दच्या विभागीय चौकशी सुरु करण्याबाबत दिलेल्या आदेशा संदर्भात कुठलेही भाष्य करणे उचीत होणार नाही. तसेच यावर कुठलाही आदेश पारित करणे हे मा.उच्च न्यायालय यांचे आदेशाच्या विपरीत व विसंगत कृती ठरणारी कृती ठरेल. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन मा.आयोगाने पारित केलेल्या दि.०४.०८.२०१७ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने नूकसान भरपाईची रक्कम ही अपिलार्थीस पूढील २ आठवड्याच्या आत प्रदान करावी. तसेच प्रस्तुत पारित आदेशानूसार कार्यालयीन अभिलेखात कलम २ (च) नूसार उपलब्ध असलेली माहिती देखील तक्रारकर्त्यास तात्काळ प्रदान करावी व या सर्व बाबींचा अनुपालन अहवाल प्रस्तुत आदेश प्राप्त झाल्यापासून २ आठवड्याच्या आत आयोगास सादर करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढून नस्तीबध्द करण्यात येत आहे.

आदेश

**उपरोक्त आदेशाचे अधिन राहून प्रस्तुत तक्रार अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : ३०.११.२०२३**

जावक क्रमांक ७३६९ दिनांक 30 OCT 2024

निर्गमित केले
30 NOV 2024